


**वारी अनुभव**
**लेख क्र. 19**

**- राजश्री कुलकर्णी** (साऊथ ब्रुन्सविक, न्यु जर्सी)

रात्री बराच वेळ झोप आली नाही. गेल्या काही दिवसांमधल्या गोष्टी एका पाठोपाठ एक आठवायला लागल्या. 'वारी' बद्दलची उत्सुकता आणि कुतूहल, माझा 'पायी वारी'साठी जाण्याचा निर्णय, त्यावर लोकांच्या प्रतिक्रिया, वारीची सुरुवात, सुरुवातीचा तब्येतीचा त्रास, अनोळखी लोकांकडून अनपेक्षित आणि अपेक्षारहित मदत, माझा 'साडी न घालता सलवार-कमीज घालण्याचा' निर्णय; त्यामुळे दिंडींमधल्या वरिष्ठ वारकऱ्यांच्या प्रतिक्रिया, भाजून काढणाऱ्या उन्हाची तीव्रता, झाडांचा अभाव, प्रवासातील ओसाड टेकड्या, महाराष्ट्र शासनाने केलेल्या वारकऱ्यांच्या सोयी, स्वयंसेवकांची मदत/सेवा, फिरते दवाखाने, सार्वजनिक शाळांच्या इमारतीमधे आमचं राहणं, टाळ-पखवाजाच्या ठेक्यावरचा सामूहिक 'हरिपाठ', टीपेला पोहोचलेल्या संगीताच्या तालावरचं ते धुंद होऊन नाचणं, 'उडी', सकाळचा अभिषेक, गोल आणि उभी रिंगणं, धावा, समाजआरती, ... कितीतरी! बघता बघता २६० किलोमीटरचा (१६० मैलांचा) प्रवास संपून, पंढरपूरला पोहोचायला आता ‘फक्त’ १४ किलोमीटर अंतर बाकी होते.

**शेवटचा टप्पा: भंडीशेगाव-पंढरपूर १४.२ किलोमीटर**

सकाळी १.३० वाजता जाग आली. सगळीकडे नीरव शांतता होती. माझ्या नेहमीच्या सवयीप्रमाणे सगळे उठण्याआधीच लवकर उठून प्रात:र्विधी आटोपले. वारकरी साखरझोपेत होते. एका झाडाखाली कट्ट्यावर एक व्यक्ती ध्यानस्थ बसलेली दिसली. डोळे मिटलेले होते. काहीही हालचाल नव्हती. जवळ जाऊन बघते तर काय? ते आमचे विठोबाकाका होते. दिवसभर गमती करून सगळयांना हसवणाऱ्या आणि ट्रकमधे सामान चढवायला मदत करणाऱ्या सत्तर वर्षांच्या विठोबाकाकांचं वेगळंच रूप बघायला मिळालं. जरा वेळाने, मी आंघोळ करून परत येऊन पाहिले, तरीही काका ध्यानमग्नच होते.

पहाटे ४ वाजता मी, चित्रा, आशाताई, रमाताई आणि लीलाताई पायी चालत निघालो. आजचा प्रवास ‘फक्त’ १४ किलोमीटर होता. पंढरपूर जवळ आलं होतं. आमच्यामधलं अंतर १० किलोमीटरपेक्षा कमी होतं. सगळ्यांचे पाय खूप दुखत होते. पायाला फोड आले होते. सुदैवाने, मी मात्र जसजशी पंढरपूरच्या जवळ येत होते, तसतसा माझ्यात बदल घडत होता. गेल्या काही दिवसांमध्ये तर तब्येतीच्या किरकोळ तक्रारीही थांबल्या होत्या, आणि नेहमीपेक्षा जास्त उत्साही वाटत होतं.

पंढरपूरला पोहोचायला आता ५ किलोमीटर बाकी होते. इथे 'संत ज्ञानेश्वर महाराज' आणि 'संत तुकाराम महाराज पालखी' महामार्ग एकत्र होणार होते. परंतु संत तुकाराम पालखी अजून पोहोचली नव्हती. त्यामुळे तुलनेने गर्दी कमी होती. 'विसावा-पंढरपूर'ला विठोबा-रखुमाईचं दर्शन घेतलं. तिथे '३ दगडांची चूल' करण्याची प्रथा आहे. साष्टांग दंडवतदेखील घालायचा असतो. कां कुणास ठाऊक रडू येत होतं. परत एकदा संमिश्र भावनांनी खूप गर्दी केली. दर्शन घेऊन प्रवास पुढे सुरू केला. आता 'पंढरपूर- विठोबा मंदिर', स्वयंभू देवस्थान फक्त ३ किमी वर होतं! दुरून कळसाचं दर्शन झालं. फक्त कळसाचं दर्शन झालं, तरीही वारी पूर्ण झाली असंही मानणारे लोक आहेत. बरेच लोक फक्त कळसाचं दर्शन घेऊन परत फिरतात. डोळ्यातून घळाघळा पाणी यायला लागलं. खरंतर प्रवास संपला होता, आता फक्त सोपस्कार बाकी होते.



चंद्रभागेत स्नान केलं. पाण्यात डुबक्या मारून एकमेकींना आंघोळी घातल्या. एकमेकींच्या अंगावर पाणी उडवलं. नवीन कपडे घालून सामान ठेवायला रमाताईंच्या ओळखीच्यांकडे गेलो. आज मात्र मी साडी नेसले, गजरा घातला, नथ घातली. आम्ही सगळ्याजणी तयार होऊन विठोबाच्या दर्शनाला निघालो. रांग खूप मोठी होती पण अर्ध्या तासात 'मुखदर्शन' झालंदेखील. सगळे शिस्तीत पुढे जात होते. रांग भराभरा पुढे सरकत होती. देऊळ अपेक्षेपेक्षा खूपच स्वच्छ होतं. सतत सफाई करायला पुरेसे लोक होते. जागोजागी पोलीस आणि स्वयंसेवक होते. अतिशय सुखद आणि प्रभावी अनुभव होता.

पंढरपूरला आम्ही, 'देशमुख दिंडी वारकरी' (ज्ञानेश्वर पालखी) आषाढी एकादशीच्या दोन दिवस आधीच पोहोचलो. तुकाराम पालखी पोहोचायला अजून अवकाश होता. त्यामुळे गर्दी मर्यादित होती. विठोबाच्या दर्शनाआधी पुंडलिकाचं दर्शन घेण्याची प्रथा आहे. हे मंदिर चंद्रभागेच्या तीरावरच आहे. त्यानंतर नामदेव पायरीचं दर्शन आणि मग विठ्ठलदर्शन, अशा या क्रमाचं वारकरी अनुसरण करतात. विठ्ठल आणि रखुमाई यांची वेगवेगळी मंदिरं आहेत. रंगीत कळस रखुमाईचा आणि दुसरा विठोबाचा!

विठ्ठलाचं मुखदर्शन घेऊन आम्ही मुक्कामाच्या ठिकाणी गेलो. माझी वारकरी-मैत्रीण चित्रा भावे हिचे आई-वडील गाडी घेऊन आम्हाला घ्यायला आले होते. जेवणं झाली. छोट्यांपासून मोठ्यांपर्यंत सगळ्यांचा निरोप घेतला. अध्यक्ष कुलकर्णी,

व्यवस्थापक देवळणकर, अण्णा, अशा सगळ्यांची भेट घेतली. पुण्याला परत जाताना पाऊस पडत होता. आभाळ भरून आलं होतं. अधे-मधे डोळा लागत होता. प्रवास खूप छान झाला.

रात्री आठच्या सुमारास पुण्याला माझ्या भावाकडे- प्रसादकडे पोहोचलो. भाऊ-वहिनी, बहीण-जिजाजी आणि इतर कुटुंबीय यांनी जय्यत तयारी केली होती. रांगोळ्या काढल्या होत्या. सनई वाजत होती. खुर्च्यांवर बसवून आमचे पाय धुतले, पायांवर कुंकवाने स्वस्तिक काढलं. गळ्यात हार घातले. ओवाळलं. आमचं जंगी स्वागत झालं. आमचा दोघींचाही प्रवास सुखरूप झाला होता. त्या रात्री मनसोक्त गप्पा मारल्यावर सगळे झोपायला गेले. मला सकाळी २.३०/३ वाजता नेहमीसारखी जाग आली. आता 'या' जगाची हळूहळू सवय करावीच लागणार होती.

प्रत्येक अनुभवातून आपण काहीतरी शिकत असतो. इगतपुरीला दहा दिवस राहून केलेली विपश्यना असो, विमानातून पंधरा हजार फुटांवरून मारलेली उडी असो, किंवा 'ब्रेस्ट कॅंसर'संबधित उपचार-संशोधन-निधीसाठी दोन दिवसात केलेला चाळीस मैलांचा पायी प्रवास असो, अशा प्रत्येक 'हटके' अनुभवातून मी घडत गेले. सुदैवाने माझ्या प्रत्येक धाडसी निर्णयाला माझ्या नवऱ्याचा आणि कुटुंबीयांचा संपूर्ण पाठिंबा होता. पॉलो कोह्लो म्हणतो, "When you want something, the entire universe conspires in helping you to achieve it!"



राजश्री कुलकर्णी, चित्रा भावे

माझी 'आळंदी ते पंढरपूर' 'पायी वारी' ठरल्याप्रमाणे पूर्ण झाली. तो एक अविस्मरणीय अनुभव होता. केवळ शारीरिक श्रमाची ती यात्रा नसून, तो एक आध्यात्मिक अनुभव होता.

***(लेखमाला समाप्त)***